# १७ वी घटना दुरुस्ती व ऑनलाईन नोंदणी

अखेर १७ व्या घटना दुरूस्तीच्या अंमलबजावणीचा दिवस उजाडला आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळाचे नुकतेच अधिवेशन संपले. विधानसभा व विधान परिषदेत १७ व्या घटनादुरूस्तीला अधिन राहुन काही महत्वाचे बदल महाराष्ट्र राज्याच्या सहकार कायद्यात करणेसाठी सहकार विधेयक मंजूर झाले आहे.



महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत व विधान परिषदेत सहकार विधेयकात ज्या गोष्टींना मंजूरी मिळालेली आहे, त्याची अधिकृत माहिती नजीकच्या काळात शासनाने प्रसिध्द करणे अभिप्रेत आहे. परंतु राज्यातील ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ सदस्यांचा कालावधी संपलेला आहे, त्यांची निवडणुक घेणेसाठी आता शासन सज्ज झालेले आहे. सर्वसाधारणपणे डिसेंबर २०१३ अखेरपर्यंत त्या निवडणुका होतील असे म्हणावयास आता काही हरकत नाही. परंतु १७ व्या घटना दुरूस्तीमधील तरतुदीप्रमाणे निवडणुक प्राधीकरणाची स्थापना, कार्यालय, पदे, कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्या कामाची व्याप्ती यासंदर्भात सहकारी संस्थांना अद्याप काहीही माहिती शासनाने पुरविली नाही. किंबहुना राज्यातील २ लाख ४० हजार सहकारी संस्थांना निवडणुक प्राधीकरणाच्या बाबतीमध्ये माहिती देण्यासाठी कुठलीच यंत्रणा सरकारकडे उपलब्ध नाही.

तालुका स्तरावर सहकारी सहाय्यक निबंधक व उपनिबंधक यांची कार्यालये आहेत. परंतु हे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व सहकारी संस्थांशी प्रत्यक्ष संपर्क साधू शकत नाहीत. कारण त्यांच्याकडे तसे मन्युष्यबळही उपलब्ध नाही. राज्यातील सहकारी संस्थांचा आवाका व आर्थिक उलाढाल ही महाराष्ट्र राज्याच्या वार्षिक आर्थिक उलाढालीच्या दुपट्टीपेक्षा जास्त आहे. असे असताना शासन बऱ्याच काही गोष्टी सहकारी संस्थांसाठी व आम जनतेसाठी जनहितार्थ करू शकते. आणि त्याचा फायदा राज्यातल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था व सभासद यांचे बरोबर इतर आम जनतेला सुध्दा होऊ शकतो.

शासनाने नुकतीच राज्यातील सर्व २ लाख ४० हजार सहकारी संस्थांची ऑनलाईन नोंदणी चालू केली होती. ३१ जुलै २०१३ पर्यंत १ लाख सहकारी संस्थांनी सुध्दा ऑनलाईन नोंदणी पूर्ण केली नाही. अर्थात याला अनेक कारणे आहेत. परंतु तालुका स्तरावरील उपनिबंधकांनी जर थेट प्रत्येक सहकारी संस्थेत जावुन ही ऑनलाईन नोंदणी करून घेतली असती, किंवा शासनाने हे काम **आऊटसोर्सिंग** केले असते तरी राज्याच्या सहकार चळवळीचा चेहरामोहरा बदलून गेला असता व खरी सहकार चळवळ लोकांसमोर आली असती. परंतु तसे झाले नाही. अजूनही वेळ गेलेली नाही.

**सहकारी संस्थांच्या ऑनलाईन नोंदणीमध्ये अनेक चांगल्या गोष्टी आहेत. परंतु अनेक त्रुटी सुध्दा आहेत**. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रत्येक सहकारी संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांची नावे, जन्म तारीख, निवास / नोकरी / व्यवसाय / गावाचे पत्ते इत्यादी प्रामुख्याने माहिती घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे राज्यामध्ये २ लाख ४० हजार सहकारी संस्थांमध्ये तेच तेच कार्यकर्ते विविध सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर आहेत. तसेच एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त लोक व त्यांचे जवळचे नातेवाईक सहकारी संस्थांवर संचालक मंडळावर आहेत. परंतु त्याची माहिती जनतेला नाही. शासनाला नाही व सहकार खात्यालाही नाही. ही बाब त्वरीत दुरूस्त करण्याची आवश्यकता आहे. सहकार कायदा व तत्सम कायद्यामध्ये शेवटी .''व्यक्ती'' हीच बाब केंद्रस्थानी आहे. आणि नेमके त्याकडे दुलर्क्ष झालेले दिसते.

**सहकारी संस्थांच्या ऑनलाईन नोंदणीमध्ये सहकारी संस्थांच्या हिताची, राज्य शासनाच्या दृष्टीने जबाबदारीची व सहकार खात्याच्या दृष्टीने उपयुक्त अशी आणखी माहिती नोंदविता येणे सहज शक्य आहे. सरकारला आम्ही या संदर्भात निश्चितपणे माहिती देत आहोत.** जेणेकरून प्रामुख्याने आर्थिक देवाण घेवाण करणाऱ्या सहकारी संस्था

सशक्तपणे व आत्मविश्वासाने आणखी चांगली वाटचाल करू शकतील. केंद्र सरकारचा इन्कम टॅक्स कायदा व राज्य सरकारची भुमिका यामध्ये नुकतीच दरी पडलेली आहे. **नागरी सहकारी पतसंस्थांकडे ठेवीदार व ठेवीवर दिलेल्या व्याजाच्या संदर्भात इन्कम टॅक्स विभागाने मागितलेली माहिती हा त्याचाच प्रकार आहे.** वास्तविक ही बाब कायद्याच्या परिभाषेतील असल्यामुळे राज्य सरकारने सबंधित इन्कम टॅक्सच्या प्राधिकरणाला त्वरीत स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. परंतू सहकारी संस्थांचा आर्थिक अवाका आपल्या राज्य सरकारलाच खऱ्या अर्थाने १०० टक्के माहित नसल्यामुळे, सरकारने ह्या बाबींची दखल घेतली नाही. **ऑनलाईन नोंदणीच्या प्रक्रियेतून दिलेली माहिती पडताळण्याची यंत्रणा सरकारने अद्याप जाहीर केली नाही.** त्यामुळेच सहकारी संस्थांची शासनावर अवलंबून राहण्याची मानसिकता कारण नसताना वाढत आहे. चांगले खुप करावसे सरकारला वाटते, परंतू ते दुसऱ्यांनी करावे व खोलात मात्र जायचे नाही हे चित्र ऑनलाईन माहिती प्रक्रीयेत आणखी बदल केल्यास व अनेक नवीन माहिती समाविष्ट केल्यास राज्याचे आर्थिक भले होईल. शिवाय पतसंस्थांनमधील ठेवीदारांना बँकांप्रमाणे संरक्षण देण्यास शासनसुध्दा पुढे येईल. पर्यायाने ठेवीदार, भागधारक यांचेच हित जपले जाईल व ही बाब राज्याच्या आर्थिक जडण घडणीमध्ये महत्वाची ठरेल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**